ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 8 | APRIL - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# स्थानिक इतिहासलेखन



**प्रा. डॉ. चांगुणा विठ्ठल कदम**
**इतिहास विभाग , बी. डी. काळे महाविद्यालय घोडेगाव**
**ता. आंबेगाव, जि. पुणे.**

**प्रास्ताविक -**

संशोधन हा शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करून बुद्धिनिष्ठ व व्यावहारिक अशा प्रश्नांची उत्तरे शोधून काढण्याचा एक प्रयत्न असतो. काय घडले? कसे घडले? का घडले? या प्रश्नांची तर्कशुद्ध उत्तरे मिळण्याची शक्यता वाढावी याच उद्देशाने संशोधन पद्धतीचा विकास झाला. इतिहास हे एक सामाजिक शास्त्र असल्याने इतिहास संशोधन ही संकल्पना रूढ झाली आहे. इतिहास संशोधन ही एक सतत चालू राहणारी प्रक्रिया आहे. जोपर्यंत भूतकाळ स्पष्टपणे पुराव्यांच्या आधारे रेखाटता येणार नाही. तोपर्यंत संशोधन ही अविरतपणे चालू राहणारी प्रक्रिया आहे.

इतिहास म्हणजे गतकालीन राजकारण, वर्गसंघर्ष, लढाया, थोरामोठ्यांची चरित्रे आणि आंदोलने इथपर्यंत मर्यादित राहिलेला नाही. अर्थात इतिहास लेखनाचा हा पारंपरिक दृष्टिकोन आता मागे पडला आहे. इतिहास म्हणजे मानवी समाजाची सर्वांगीण कहाणी या अर्थाने माणूस हा इतिहास लेखनाच्या केंद्रस्थानी आलेला आहे. मानवी जीवनाशी संबंधित सर्वच अंगोपांगांचा ऊहापोह इतिहासलेखन करताना केला जातो. इतिहासविषयक नव्या प्रवाहांनी अथवा नवनवीन दृष्टिकोनांमुळे इतिहास आता समृद्ध बनत आहे. इतिहासात विविध दृष्टीकोनांबरोबर आंतरविद्याशाखीय मांडणी होऊ लागलेली आहे. याचे बरेचसे श्रेय ॲनल्स परंपरेला जाते. इतिहासात केवळ समग्रलक्षी इतिहास महत्त्वाचा नसून सूक्ष्म इतिहासही तितकाच महत्त्वाचा बनला आहे. स्थानिक इतिहास हेही ॲनल्स परंपरेचे फलित मानले जाते. सद्यस्थितीत जगभरात स्थानिक इतिहास लेखनाला चालना मिळालेली दिसते. प्रस्तुत शोधनिबंधाची मांडणी स्थानिक इतिहास लेखन या शीर्षकाखाली करण्यात आलेली आहे.

**मुख्य शब्द -** स्थानिक इतिहास लेखनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, अर्थ, उद्देश, घटक, महत्त्व.

**संशोधनाची उद्दिष्टे -**

१) स्थानिक इतिहास लेखनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासणे.
२) स्थानिक इतिहासाचा अर्थ स्पष्ट करणे.

३) स्थानिक इतिहास लेखनाचा उद्देश स्पष्ट करणे.

४) स्थानिक इतिहास लेखनाचे घटक, विविध पैलू अधोरेखित करणे.

५) स्थानिक इतिहासाचे महत्त्व विशद करणे.

## संशोधनाची गृहितके –

१) १६ व्या शतकापासून स्थानिक इतिहास लेखनाची सुरुवात झालेली पहावयास मिळते.

२) स्थानिक इतिहासाचा अर्थ हा भौगोलिक स्थानाच्या संदर्भात दर्शविला जातो. ३) स्थानिक ठिकाणांचा अथवा घटनांचा अभ्यास करणे हा स्थानिक इतिहास लेखनाचा उद्देश आहे.

३) स्थानिक इतिहास लेखनाच्या विविध घटकांत राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, प्रशासकीय याशिवाय इतर घटकांचा समावेश होतो.

४) स्थानिक इतिहास लेखनाचे महत्त्व अनन्यसाधारण स्वरूपाचे आहे.

## संशोधन पद्धती -

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.

## स्थानिक इतिहास लेखनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी -

सोळाव्या शतकात इंग्लंडमध्ये स्थानिक इतिहास लेखन संकल्पनेचा उदय झाला. लंडन शहराचा सूक्ष्म पद्धतीने सर्वेक्षण करून त्यावर आधारित इसवी सन १८९४ मध्ये ४४ खंड प्रकाशित करण्यात आले. स्थानिक इतिहास लेखनाच्या माध्यमातून एवढे मोठे लिखाण होणारे हे पहिले शहर होते. रॉबर्ट डॉय यांनी स्थानिक इतिहासाविषयी केलेले लेखन महत्त्वाचे आहे. यातूनच पुढे लंडन विद्यापीठात 'इन्स्टिट्यूट ऑफ हिस्टॉरिकल रिसर्च' स्थापन करण्यात आले. त्यामुळेच लंडन शहराला स्थानिक इतिहासाची जननी असे म्हणतात. याच काळात फ्रान्समध्ये स्थानिक किल्ले, नाणी, चर्च, शस्त्रास्त्रे, संग्रहालये, घराणी इत्यादींचा इतिहास लिहिण्यास प्रारंभ झाला. १९ व्या शतकामध्ये स्थानिक इतिहास लेखनाचा हा प्रवाह अमेरिका खंडामध्ये पोहोचला. अमेरिकेतील व्यापारी, उद्योगपती, प्रसिद्ध व्यक्ती, चर्चचा कारभार पाहणारे अधिकारी व मिशनरी यांनी १८४० च्या सुमारास आपापल्या क्षेत्रातील उद्योग व्यवसायाचा इतिहास लिहिण्यास सुरुवात केली. इंग्लंडमधून अमेरिकेमध्ये स्थायिक झालेल्या लोकांनी स्थानिक पातळीवरील उद्योग, अमेरिकन स्वातंत्र्य युद्धात भाग घेतलेले स्थानिक नेते तसेच स्थानिक इतिहास लेखनाचा भारताच्या विशेषतः महाराष्ट्राच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास १८३६ मध्ये प्रसिद्ध झालेले गोविंद माडगावकरांचे 'मुंबईचे वर्णन', १९६८ मध्ये प्रसिद्ध झालेले ना. वि. जोशी यांचे 'पुणे शहराचे वर्णन' आर. व्ही. सबनीस यांचे 'नोट्स ऑन कोल्हापूर' अशा ग्रंथांद्वारे १९ व्या शतकामध्ये स्थानिक इतिहासाचा पाया घातला गेला. विसाव्या शतकात स्थानिक इतिहासाची ही परंपरा अधिक वृद्धिंगत झाली.

अखिल भारतीय स्तरावर स्थानिक इतिहास लेखनाची संकल्पना व सैध्दांतिक मांडणी रोमिला थापर यांनी इसवी सन १९७६ मधील पंजाब इतिहास परिषदेच्या अध्यक्षपदावरून केलेल्या प्रादेशिक व स्थानिक इतिहास या विषयावर केलेल्या मांडणीपासून झाली असे मानले जाते. तेव्हापासून भारतात या नवीन विचार प्रवाहाचा खऱ्या अर्थाने अभ्यास सुरू झाला.

आधुनिक काळात इतिहास अभ्यासाचे अनेक दृष्टिकोन उदयाला आले. त्यामध्ये साम्राज्यवादी, पौर्वात्यवादी, राष्ट्रवादी, नवमार्क्सवादी इत्यादी दृष्टिकोनांचा समावेश होतो. या सिद्धांताबरोबर स्थानिक इतिहास लेखनाचा सिद्धांतही उदयाला आला. इतिहासाची मर्यादा पूर्वी साहित्य, तत्त्वज्ञान, राज्यशास्त्र या विषयांशी संबंधित होती. परंतु काळाच्या ओघात या परिस्थितीत बदल होऊन मानवाच्या हालचालींशी निगडित अशा सर्वच बाबींचा इतिहासामध्ये ढोबळमानाने समावेश होतो. थोडक्यात, "समाजाचा घटक या नात्याने व्यक्तीच्या सर्व हालचाली हा इतिहासाच्या व्याप्तीचा विषय बनतो."१

## स्थानिक इतिहास लेखनाचा अर्थ -

वास्तविक पाहता स्थानिक इतिहासाची संकल्पना युरोपमध्ये उदयास आली. भारतामध्ये ही संकल्पना नवीन असली तरी या संकल्पनेतून या अगोदरच अनेक शहरांचा इतिहास लिहिलेला आहे. स्थानिक इतिहास लेखनात 'गाव' ही भौगोलिक संकल्पना महत्त्वाची आहे. एखाद्या गावात राहणाऱ्या व्यक्तीला स्थानिक अथवा गावकरी म्हणतात. त्या स्थानिकांची स्वाभाविकपणे आपल्या गावाशी एक विशिष्ट नाळ आणि भावना जोडलेल्या असतात. स्थानिक इतिहासकार इतिहास लिहिताना त्या भावना ऐतिहासिक घटना आणि त्या घटनांशी संबंधित असलेल्या व्यक्ती यांच्या माध्यमातून शब्दबध्द करतो. यासंबंधी अरुण टिकेकर म्हणतात, "हा एका अर्थाने भूतकाळात रमू पाहणाऱ्यांचा छंद. आपल्या गावाचा वा शहराच्या तसेच त्या शहरातील आपल्या ऋणानुबंधाबद्दल आपुलकी, प्रसंगी अभिमान वाटणं ही सहजभावना होय. आपल्या गावाबद्दलच्या काही स्मृती आनंददायक तर काही क्लेशदायक असू शकतात. पण घटना घडून बरीच वर्ष उलटल्यामुळे आनंददायक व कलेशदायक अशा दोन्ही स्मृती बद्दल कातरता येत असते. ही स्मृती कातरता प्रभावी शैलीत पकडण्यावर स्थानिय इतिहासकाराचे यश अवलंबून आहे."२ एका अर्थाने स्थानिक इतिहास हा प्रादेशिक इतिहासाचा एक उपविभाग आहे. एखाद्या स्थानाभोवती किंवा ठिकाणाभोवती केंद्रीत राहून त्या स्थानाचे इतिहास लेखन करणे म्हणजेच स्थानिक इतिहास होय. स्थानिक इतिहास लेखनात उपलब्ध पुराव्यांचे संशोधन करून भूतकाळात घडून गेलेल्या घटनांची मांडणी केली जाते. तसेच उपलब्ध ऐतिहासिक माहितीचे संकलन आणि विश्लेषण केले जाते.

## स्थानिक इतिहास लेखनाचे उद्देश -

कोणत्याही अभ्यास घटकांचा सर्वंकष अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. इतिहास संशोधनामध्ये सखोलता, नव्या जाणीवा, वंचित घटक, ॲनल्स, सबाल्टर्न, स्त्रीवाद, राजकीय मांडणी, पारंपरिक साधनांसमवेतच अन्वयार्थी दृष्टिकोन तसेच माहिती व तंत्रज्ञानाचा वापर, स्थानिक प्रेरणा, मिथके, लोक कथांमधील सत्यांश इत्यादी सर्व घटकांचा अभ्यास करून आपणास स्थानिक इतिहास मांडणीची सुरुवात करता येऊ शकते. स्थानिक इतिहासाची शास्त्रशुद्ध पद्धतीने मांडणी करण्याची मुख्य जबाबदारी इतिहास संशोधक, अभ्यासकांवर आहे. ही जबाबदारी पूर्ण करण्यासाठी आपणास प्रचलित संशोधकीय नियमांची चौकट सांभाळून जागतिकीकरणास जी अन्वयार्थी मांडणी उत्तर देऊ शकेल अशी मांडणी करणे गरजेचे आहे. मागील पन्नास वर्षांमध्ये स्थानिक इतिहास लेखनाची संकल्पना विकसित होत आहे. हा इतिहासाच्या दृष्टीने संक्रमणाचा काळ व व्यापक ऐतिहासिक चळवळींचा कालखंड आहे. प्रथम अभ्यासकाने एका प्रभागाची किंवा वाडी किंवा खेड्याची इतिहास लेखनासाठी निवड करावी. निवड केलेल्या गावात किमान अल्पकाळ होईना इतिहास परंपरा असते. स्थान निश्चिती, प्रशासकीय निकष, सांस्कृतिक सीमा, भौगोलिक सीमा, आणि पर्यावरण इत्यादी घटकांची निवड करून प्रत्येक मुद्द्यांची सविस्तर माहिती मिळविणे आवश्यक आहे.

गावातील लोककथा, परंपरा, मिथके, धान्य, पिके, जमिनीची नावे का मिळाली, उपनामे कशी अस्तित्वात आली याविषयीचा सविस्तर वृत्तांत लिहिणे गरजेचे आहे. गावांच्या नावांमध्ये काही पौराणिक धागे आहेत. त्यांचा अन्वयार्थ साधता आला पाहिजे. त्याचप्रमाणे बदलत्या कालमापनानुसार कथांमध्ये मौखिकतेमुळे भर पडते. त्याचाही वेध घेणं गरजेचं आहे. त्यासाठी अभ्यासकास सामाजिक, आर्थिक घटकांची माहिती हवी.

इतिहास संशोधक अथवा अभ्यासकाला जागतिक, राष्ट्रीय किंवा राज्यस्तरावरील घटना माहीत असतात. मात्र एखाद्या गावातील घटना अथवा वास्तूची माहिती नसते. वास्तविक पाहता व्यक्ती, व्यक्तीसमूह, सामाजिक वैशिष्ट्ये हे इतिहासाचे अनुबंध स्थानिक इतिहासाशी जवळीक ठेवणारे असतात. प्रत्येक गावावर प्राचीन ते आधुनिक काळापर्यंत अनेक राजसत्तांनी राज्य केलेले असते. त्या राजसत्तेच्या स्थित्यंतराच्या अनेक खाणाखुणा अनेक गावागावात विखुरलेल्या असतात. बऱ्याच प्रसंगी एखादे गाव विशिष्ट राजसत्तेमुळे प्रकाशात आलेले नसते तर ते गाव त्यांच्या सांस्कृतिक, सामाजिक व धार्मिक वैशिष्ट्यामुळे प्रसिद्धीस आलेले असते. त्यामुळे अशा प्रकारच्या स्थानिक ठिकाणांचा अथवा घटनांचा अभ्यास करणे हा स्थानिक इतिहास लेखनाचा उद्देश आहे. आजच्या काळात मोठ्या स्थानिक इतिहासाचे संशोधन होऊन सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या संशोधनापासून वंचित राहिलेला मोठा इतिहास संशोधकांसमोर येणे गरजेचे आहे. प्रादेशिक साहित्य संशोधन हे संशोधकांच्या समोर मोठे आव्हान आहे, हे लक्षात घ्यावे लागते. प्रदेशांच्या इतिहासाची आवश्यकता प्रतिपादन करताना प्रा.रा. वि.ओतुरकर अशी मांडणी अशी मीमांसा करतात की, "साने गुरुजींचे आंतरभारतीचे स्वप्न साकार करावयाचे असल्यास केवळ भारतातील भाषा भगिनींचीच ओळख करून घेणे पुरेसे होणार नाही. तर त्या त्या प्रदेशांच्या इतिहासाचे स्वतंत्रपणे ज्ञान करून घेणे आवश्यक आहे. एखाद्या प्रदेशाचा इतिहास जाणून घेण्यास त्या प्रदेशाची अस्मिता काय आहे याचे आकलन झाले पाहिजे. प्रत्येक प्रांतियाने आपापल्या परीने स्वतंत्र रीतीने ते करून घेतले पाहिजे. या दृष्टीने स्थानिक संशोधनाचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे. "३

## स्थानिक इतिहास लेखनाचे घटक -

स्थानिक इतिहास लेखन करत असताना विविध पैलूंचा संशोधकास अथवा अभ्यासकास आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते. त्यात संबंधित गाव अथवा ठिकाणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, भौगोलिक घटक, सामाजिक जीवन, सांस्कृतिक जीवन, आर्थिक जीवन, राजकीय व प्रशासकीय जीवन इत्यादीचा समावेश होतो. याशिवाय इतिहासाची व्याप्ती स्थल व कालसापेक्ष आहे. अभ्यासाच्या सोयीसाठी प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक अशी काळाच्या आधारावर विभागणी केली जाते. किंवा स्थळाच्या निकषावर केली जाणारी विभागणी जशी की, जागतिक, राष्ट्रीय, प्रादेशिक आणि स्थानिक इतिहास. विशेषतः प्रादेशिक इतिहासाचा पोटविभाग म्हणून ज्याची ओळख आहे तो स्थानिक इतिहास. यासंदर्भात डॉ. राजा दीक्षित यांनी प्रादेशिक इतिहासाची मांडणी करताना स्थानिक इतिहासाला केंद्रस्थानी ठेवलेले आहे. ते म्हणतात की, "इतिहास हा वैश्विकता आणि विशिष्टता या दोघांचा वेध असतो. त्यातील अनेकदा दुर्लक्षित राहणारा विशिष्टतेचा पैलू प्रादेशिक इतिहासामुळे प्रकाशात येतो."४ प्रादेशिक इतिहासाचा पोटविभाग म्हणजेच स्थानिक इतिहास होय. आज संशोधकांचे आवडीचे क्षेत्र म्हणून स्थानिक इतिहासाकडे पाहिले जाते. इतिहासाच्या जडणघडणीमध्ये समाजाचा प्रत्येक घटक असतो. स्थानिक व प्रादेशिक इतिहासातून राष्ट्रीय इतिहास आकार घेतो. प्रादेशिक इतिहासाच्या मांडणीमध्ये भूतकाळ हा राष्ट्रीय नव्हे तर स्थानिक परिवेशांमध्ये सामावलेला असतो.

### स्थानिक इतिहास लेखनाचे महत्त्व -

स्थानिक इतिहास लेखनाचे अवलोकन केले असता, त्याचे विविध दृष्टिकोनातून महत्व लक्षात येते. व्यक्ती आणि स्थळ हे इतिहास अभ्यासाचे मुख्य विषय आहेत. यामध्ये मुख्य वर्ग विषय समाजाची जडणघडण, समाजाची जीवन प्रणाली त्यांच्या चालीरीती, रूढी, परंपरा, संस्कृती, धार्मिक निष्ठा, समाजातील भिन्न घटकांचे परस्पर संबंध, कुटुंब संस्था, त्यांचे स्वरूप, उदरनिर्वाहाची साधने, उद्योग, करमणुकीची साधने, कलाभिव्यक्तीचे प्रकार, सामाजिक संस्था, सामाजिक स्थित्यंतरे इत्यादी अनेक विषयांचा अभ्यास यामध्ये समाविष्ट असतो. स्थानिक इतिहास हा भौगोलिक दृष्ट्या स्थानिक संदर्भाच्या विशेषतः स्थानिक समुदायावर लक्ष केंद्रित करतो. यामध्ये प्रामुख्याने सांस्कृतिक व सामाजिक पैलूंचा अंतर्भाव असतो. स्थल इतिहासातील दुसरे महत्त्वाचे परिमाण आहे. कारण स्थानिक संदर्भ व्यक्ती जीवनाप्रमाणेच समाज जीवन देखील प्रभावित करतो. स्थानिक इतिहासातून आर्थिक इतिहासाचे अध्ययन होत असते. त्यामध्ये शेती व शेतीशी संबंधित उद्योगधंदे, व्यापार, दळणवळण, व्यापारी संस्था, ग्रामीण बँका, इत्यादींचे महत्त्व अधोरेखित केले जाते. याशिवाय दोन विभागांचा सामाजिक व आर्थिक दृष्टिकोनातून तुलनात्मक अभ्यास केला जातो.

### निष्कर्ष -

१) स्थानिक इतिहास लेखनाच्या माध्यमातून मानवी जीवनाशी संबंधित सर्वच अंगोपंगांचा ऊहापोह केला जातो.
२) जगभरात सद्यस्थितीत स्थानिक इतिहास लेखनाला चालना मिळालेली दिसून येते.
३) सोळाव्या शतकात इंग्लंडमध्ये स्थानिक इतिहास लेखन संकल्पनेचा उदय झाला.
४) स्थानिक इतिहास लेखन अभ्यासामध्ये आपणास गुणात्मक पद्धतीने व सूक्ष्म पद्धतीने शोध घेता येतो.
५) स्थानिक इतिहास लेखनाच्या माध्यमातून संस्कृती संवर्धनाचा प्रयत्न केला जातो.
६) स्थानिक इतिहासाच्या माध्यमातून लोकसंस्कृतीचा अभ्यास करता येतो.
७) दुर्लक्षित घटक प्रथा, परंपरा, आचार विचार, कथा, पुराणकथा, दंतकथा यांचा नव्याने विचार करता येतो.

### संदर्भ टिपा –

१) बी एन. सरदेसाई, इतिहास लेखनशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, २००२, पृ.२५.
२) वि. गो. लेले, (अनु.), इतिहास म्हणजे काय? कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९९४, पृ. ५०.
३) रा. वि. ओतुरकर, इतिहासाच्या अभ्यासातील नवीन गरजा, शं. द. जावडेकर व इतर (संपा.), नवभारत, दी प्राज्ञ प्रेस वाई, वर्ष ७, अंक १, ऑक्टोबर १९५३. पृ. ७.
४) राजा दीक्षित, मराठा इतिहास लेखन परंपरा आशय आणि संदर्भ, इतिहास शिक्षक त्रैमासिक, पुणे, एप्रिल - मे - जून २०१२, पृ. १९.
५) उमेश बगाडे, (संपा.), समाजप्रबोधनपत्रिका, पुणे, २०१०.
६) प्रभाकर देव, इतिहास शास्त्र - संशोधन अध्यापन आणि लेखन परंपरा, ब्रेन रॉनिक प्रकाशन गृह, नाशिक, २००७.
७) आपटे प्र. प्रा. स्थानिक इतिहास लेखनाचे बहुविध आयाम, एकता प्रकाशन, पुणे, २०१५.

८) अरुणा मोरे व इतर (संपा.), इतिहासाची ओळख, राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०१५.

९) सुहास राजदरेकर, इतिहास लेखन शास्त्र, विद्या प्रकाशन नागपूर, प्रथमावृत्ती, १९९८.

१०) K. N. Chitnis, Research Methodology in History, Atalantic Publisher, New Delhi, 1998.